**नियमित दिवाणी दावा क्र.२३५/२०२२**
मुरलीधर रामभाऊ व इतर
वि.
विठ्ठल नागु व इतर
MHAH190008762022

**<u>आदेश निशाणी क्र.२८ खाली.</u>**

१. अर्जदार वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम. ६ नियम १७ नुसार वादी क्र.०३ चे वारस रेकॉर्डवर घेऊन दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे कथन आहे की, वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दि. २०/०१/२०२५ रोजी मयत झाले आहे. त्यांचे मृत्यूप्रमाणपत्र सोबत दाखल केले आहे. त्यांचे पश्चात त्यांना खालील वारस आहेतः–

३ अ) शशिकला मुरलीधर जह्न्हाड, वय ६० वर्ष, धंदा– शेती,

३ब) प्रियांका महादेव जन्हऱ्हाड, वय ३० वर्ष धंदा शेती,

३ क) चैतन्य महादेव जऱ्हाड, वय १३ वर्ष धंदा – शिक्षण,

३ ड) सोहम महादेव जऱ्हाड, वय ०९ वर्ष धंदा– शिक्षण,

प्रतिवादी ३ अ ते ड रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

प्रतिवादी ३ क व ३ ड हे अज्ञान असून त्यांची अ.पा.क. आई प्रतिवादी ३ ब ही आहे. उपरोक्त वारसांना वादी क्र.०३ चे वारस म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर वारसांना रेकॉर्डवर घेऊन दावा दुरुस्तीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. तसेच वादीचे सदर अर्जात पुढे अशी विनंती आहे की, मूळ दावा परिच्छेद क्र.६ मध्ये नजरचुकीने व टायपिंग मिस्टेक मुळे अनावधानाने काही भाग टायपिंग करण्याचा राहून गेलेला आहे, अनावधानाने चुकीचे टाईप झालेले आहे –

"वादी यांनी सदर मिळकती पैकी ० हे. ०४ आर. त्यांची मुले बंडू मुरलीधर ज–हाड व महादेव मुरलीधर जऱ्हाड यांना राहण्यासाठी सत्य प्रतिज्ञापत्र किंवा संमतीपत्र करून दिलेले आहे." हा भाग डिलीट करून त्या ऐवजीः–

"वादी नं.१ यांनी सदर मिळकत पैकी ० हे. ०४ आर त्यांची मुले वादी नं. २ मुरलीधर ज–हाड व वादी नं. ३ महादेव मुरलीधर ज–हाड यांना राहण्यास सत्य प्रतिज्ञापत्र

किंवा समंतीपत्र पूर्वीच मोबदला स्वीकारल्याने मूळ मालक आसाराम शिवराम डुकरे यांना करून द्यायला लावलेले आहे व त्यांनी तसे करून दिलेली आहे."

या प्रमाणे दुरुस्ती ची मागणी केली आहे.

**४.** प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. त्यांनी निशाणी क्र.३० वर त्यांचा खुलासा दाखल केला आहे. त्यांचे कथनानुसार वादीचे अर्ज कायदेशिर तरतुदीस अनसुरुन नाहीत. तसेच अर्जातील करण हे संयुक्तिक नाही. त्यावरुन त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**५.** वादी व प्रतिवांदीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. वादीने अभिलेखावर वादी महादेव मुरलीधर ज–हाड यांचे मृत्यूप्रमाण पत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार महादेव मुरलीधर ज–हाड यांचे दि.२०/०१/२०२५ रोजी निधन झाल्याचे दिसुन येते. विलंब माफीचा अर्ज निशाणी क्र.२६ कॉस्ट वर मंजूर करण्यात आलेला आहे.

**६.** वादी महादेव मुरलीधर ज–हाड हे मयत झाले असले तरी त्यांच्या वारसांना प्रतिवादी विरुध्द दाद मागण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन दुरुस्ती केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. या उलट दावा परिपूर्ण, गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी व दाव्याची बहुविधता टाळण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेवून दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज निशाणी क्र.२८ मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी पुढील तारखे पर्यंत महादेव मुरलीधर ज–हाड यांचे वर नमूद वारस तसेच परिच्छेद क्र.६ मध्ये प्रस्तावित दुरस्ती करावी व तशी दुरुस्ती प्रत दाखल करावी.

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.12 11:27:46 +0530

दि.०९/०३/२०२६

(वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर,
शेवगाव.